# पनवेलच्या नगराध्यक्षपदी चारूशिला घरत
# तर उपनगराध्यक्षपदी मदन कोळी यांची फेरनिवड

पनवेल (प्रतिनिधी) पनवेल नगरपरिषदेच्या निवडणुकीत विद्यमान नगराध्यक्षा चारूशिला घरत व उपनगराध्यक्ष मदन कोळी यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाल्यामुळे त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून त्यानुसार नगराध्यक्षपदी चारूशिला घरत तसेच उपनगराध्यक्षपदी मदन कोळी यांची बिनविरोध पुर्ननिवड झाली.

येत्या ऑक्टोंबरमध्ये विधानसभेची निवडणुक असल्याने अडीच वर्षाचा कार्यकाल संपलेल्या नगरपरिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष यांच्या निवडणुकांना शासनाने मुदतवाढ दिली होती. तथपि कायद्यात सुधारणा करून शासनाने मुदत ५ जुलै रोजी संपुष्टात आणली. त्यामुळे रायगड जिल्हयातील नगरपरिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका येत्या १८ जुलैला घेण्यात याव्यात असे आदेश जिल्हाधिकारी सुमंत भांगे यांनी दिले होते. त्यानुसार शुक्रवारी पिठासीन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी मकरंद देशमुख तसेच उपविभागीय अधिकारी व पनवेल नगरपालिकेचे प्रभारी मुख्याधिकारी सुदाम परदेशी यांच्या अधिपत्याखाली पनवेल नगरपरिषदेच्या सभागृहात नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षपदाची ही निवडणूक पार पडली. गेल्या अडिच वर्षात नगराध्यक्षा चारूशिला घरत यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेने अनेक लोकहिताची कामे हाती घेतली व पूर्णत्वास नेली. यामध्ये प्रामुख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, नाटयगृह, ना फेरीवाला क्षेत्रावर नियंत्रण, शहरातील भुयारी गटार योजना, सिमेंट कॉक्रीट रस्ते, अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण, पाणी पुरवठा योजना, स्वच्छता व आरोग्यविषयक अंमलबजावणी, स्मशानभुमींचे नुतणीकरण व डागडुजी, बगीचेंचे सुशोभिकरण, तलावांची स्वच्छता, आपत्ती निवारण, वृक्षारोपण या सारख्या विविध विकासकामांना गती दिली व नगरपालिकेला अधिक सबळ व सक्षम करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न झाले. चारूशिला घरत यांच्या कार्यशैलीवर समाधन व्यक्त करून पुन्हा एकदा कॉग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या खांद्यावर नगराध्यपदाची धुरा दिली आहे.

या निवडीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत, उपाध्यक्ष जी.आर.पाटील, ज्येष्ठ नेते भक्तीकुमार दवे, तालुकाध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, शहर कॉग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, प्रवक्ते वाय.टी.देशमुख, शशिकांत बांदोडकर, सिराज सय्यद, महिला कॉग्रेसच्या तालुकाध्यक्षा ॲड.आशा भगत, कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, कार्याध्यक्षा सुहासिनी शिवणेकर, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, मावळ लोकसभा युवक कॉग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, कॉग्रेसचे गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजू सोनी, पाणी पुरवठा सभापती सुभाष भुजबळ, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, नगरसेवक संतोष शेट्टी, प्रकाश बिनेदार, मनोहर म्हात्रे, गणेश पाटील, रमेश गुडेकर, शिवदास कांबळे, गणपत म्हात्रे, लतीफ शेख, नगरसेविका निर्मला म्हात्रे, सिता पाटील, नाझ हाफीज, कल्पना ठाकूर, मंगला राणे, स्मिता पाटील, सुनंदा पाटील, प्रमिला कुरघोडे, अलका भगत, संगीता कांडपाल, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, कमलाकर घरत, उरण कॉग्रेसच्या तालुकाध्यक्षा सीमा घरत आदी मान्यवरांसह आजी-माजी नगरसेवक, विभागीय अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी नवनिर्वाचित नगराध्यक्षा चारूशिला घरत व उपनगराध्यक्ष मदन कोळी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.